# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सांगली　　**P.S.**(ठाणे): महात्मा गांधी चौक　　**Year** (वर्ष): 2020

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0022　　**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 28/01/2020 23:18 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार　　**Date From** (दिनांक पासून): 28/01/2020

**Time Period** (कालावधी): पहर 5　　**Date To** ( दिनांक पर्यंत): 28/01/2020

**Time From** (वेळेपासून): 13:41 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 13:41 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 28/01/2020　　**Time** (वेळ): 23:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 035　　**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 28/01/2020 23:00 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 2 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पंचायत समिती कार्यालय मिरज, पशु संवर्धन विभाग पशुधन, विकास अधिकारी केबिनमध्ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.प्रविण राजाराम कांबळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988　　(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):　　**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | समाज मंदीर ,सलगरे ता मिरज,महात्मा गांधी चौक,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | समाज मंदीर ,सलगरे ता मिरज,महात्मा गांधी चौक,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ड.प्रविण सुभाष सवासे | | | 1. रत्नप्रिया आंगण,302 दिडीवेस, ब्राम्हणपूरी,,मिरज,महात्मा गांधी चौक, सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच घेतलेली रक्कम | 8,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 8,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियांसह राहणेस आहे. माझी सलगरे येथे शेती असुन मी शेतीचा व्यवसाय करतो. मी जुलै 2019 मध्ये शासनाच्या विशेष घटक योजनेअंतर्गत शेळीगट या योजने साठी पंचायत समिती मिरज येथे अर्ज दिला होता. सदरचा अर्ज मंजूर झालेला असून सदर योजने नुसार 10 शेळी व 1 बोकड खरेदी करावी लागते व ते खरेदी केल्या नंतर त्यांचे फोटो पंचायत समीती कार्यालय येथे जमा करावे लागतात. त्यानंतर सदर खरेदी करीता लागलेल्या रक्कमेतील 75 टक्के शासनाचे अनुदान मिळते. मी शेळी गट योजनेसाठी पंचायत समिती मिरज येथे दिले अर्जा वरुन जानेवारी 2020 मध्ये माझे हे प्रकल्प मंजुर झाले असुन त्यास लागणारे आवश्यक कागदपत्रांची मी पुर्तता केलेली आहे. माझे कागदपत्रांची पुर्तता झाले नंतर दि.23/01/2020 रोजी मी पंचायत समीती कार्यालय मिरज येथील पशुधन विकास अधिकारी ड. श्री सवासे यांना भेटुन त्यांना शेळ्या व बोकड खरेदी बाबत विचारणा केली असता त्यांनी मला तुला शासनाचे अनुदानाची रक्कम पाहीजे असल्यास शेळी व बोकड खरेदी करण्याचे अगोदर मला येत्या सोमवारी किंवा मंगळवारी तु 12,000/-रुपये दिलास तरच मी तुला शासनाचे अनुदान मंजूर करुन देतो, नाहीतर तुझे अनुदान मंजूर होणार नाही असे सांगीतले. त्यावर मी त्यांना 12,000/-रुपये कसले. असे विचारले असता त्यांनी मला सांगीतले की, तुला शासनाचे एवढे अनुदान मिळणार, मग मला काय नको काय? असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ठिक आहे असे सांगुन तेथुन निघुन आलो. उदया दिनांक 28.01.2020 रोजी सकाळी 11.00 वा. मी पंचायत समीती कार्यालय मिरज येथील ड. श्री सवासे, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती मिरज यांची त्यांचे कार्यालयात जावून भेट घेऊन त्यांनी यापूर्वी माझेकडे मागणी केले 12,000/-रुपये लाचेच्या रक्कमेबाबत नाईलाजाने चर्चा करणार आहे. मला ड. सवासे यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही. तरी ड.सवासे, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, मिरज यांचेवर कायदेशीर कारवाई व्हावी असा माझा लेखी तक्रारी अर्ज श्री.चौगुले साहेबांचे समक्ष दि.27.01.2020 रोजी हजर केला. त्यानंतर मी दिलेला अर्ज चौगुले साहेबांनी वाचून त्यावर सही केली. त्यानंतर चौगुले साहेबांनी मला उदईक दि.27.01.2020 रोजी सकाळी 10.30 वाजण्याच्या सुमारास दुय्यम बाजार समिती मार्केट यार्ड मिरज या ठिकाणी येण्याबाबत तसेच सदरबाबत गोपनीयता राखण्याबाबत सुचना दिल्या. व मला जाणेस सांगीतले, त्याप्रमाणे मी निघून गेलो. दि. 28.01.2020 रोजी सकाळी 10.00 वा.चे सुमारास श्री.चौगुले साहेब यांनी मला संपर्क करुन टाटा सुमो गाडीचे वर्णन सांगून दुय्यम बाजार समिती मार्केट यार्ड मिरज येथे येणेबाबत कळविले. त्याप्रमाणे मी माझे कडील मोटर सायकलवरुन त्याठिकाणी गेलो. त्यावेळी चौगुले साहेबांनी माझी व पंच साक्षीदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. तसेच सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर मला माझी लाचलुचपतीची तक्रार दोन्ही पंचाना तोंडी सांगण्यास सांगीतली असता, मी माझे तक्रारी अर्जात नमुद असल्याप्रमाणेच तक्रार दोन्ही पंचाना सांगीतली. त्यानंतर

चौगुले साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचणेस दिला. दोन्ही पंचानी तक्रारी अर्ज वाचून मी, तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे सांगून तक्रार वाचलेबाबत तक्रारी अर्जावर दोन्ही पंचानी सहया केल्या. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्ड व मेमरी कार्ड बाबत माहिती देवून पडताळणी कामी मला व पंच नं.1 यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर चौगुले साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. मी तो माझे अंगावरील पन्टचे समोरील डावे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. कलकुटगी यांना लोकसेवक ड.सवासे, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती मिरज यांची त्यांचे कार्यालयात जावून त्यांचे कार्यालयात भेट घेण्यास जाणेकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 श्री. कलकुटगी असे माझेकडील बजाज डिस्कवर कंपनीची मोटरसायकल क्र. एम.एच.10-बी.एच.8334 वरून रवाना होवून पंचायत समिती कार्यालय मिरज या ठिकाणी गेलो. मी माझेकडील मोटरसायकल पंचायत समिती कार्यालयाचे बाहेर पार्क केली. त्यानंतर मी व पंच नं.1 असे पंचायत समिती कार्यालयातील पशू संवर्धन विभागामध्ये गेलो. त्या ठिकाणी केबीनमध्ये ड. सवासे, खुर्चीमध्ये बसलेले होते. मी व पंच नं.1 असे सदर केबीनमध्ये जावून दोघेही ड. सवासे यांचे समोरील खुर्चीवर बसलो. मी ड.सवासे, यांना उद्या बाजारामध्ये शेळ्या खरेदी करायला येवू काय असे विचारले. त्यावेळी त्यांनी या म्हणून सांगून येताना मी बोललेले ते पैसे तेवढे घेवून ये असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना किती म्हणून विचारले असता, ड.सवासे यांनी दहा हजार रुपये घेवून ये असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना दहा हजार रुपये जास्त होतय, काही तरी कमी करा असे म्हणून पैसे कमी करण्याबाबत विनंती केली. त्यावर त्यांनी बर ठिक आहे नऊ हजार रुपये दे, असे म्हणालेवर मी त्यांना एवढं माझेकडून होत नाही, माझेकडून आठ हजार रुपये होतील असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी ठिक आहे आठ हजार तर आठ हजार रुपये घेवून ये, उद्या शेळ्या खरेदी करु या, तुझं म्हणून आठ हजार मध्ये काम करतो असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना सध्या माझेकडे पैसे नाहीत माझे सांगलीत काम आहे. वकीलाचा फोन येत आहे असे सांगीतले. व येताना मित्राकडून पैसे घेवून येतो, व जाताना देवून जातो असे म्हणून मला वाटलं तुम्ही चार पांच हजार रुपयामध्ये काम करचाल असे वाटले होतं असे म्हणाले. त्यावर ड.सवासे यांनी मला बाकीच्या अधिका-यांना मला पैसे दयायला लागतात असे म्हणाले, त्यावेळी मी त्यांना बर ठिक आहे असे म्हणून आठ हजार रुपये जाते वेळी तुम्हाला देवून जातो असे म्हणून मी व पंच नं.1 असे तेथून निघून बाहेर येवून मी व पंच नं.1 असे त्याठिकाणावरुन माझे मोटर सायकल वरुन निघून श्री.चौगुले साहेब थांबले ठिकाणी आलो. त्यावेळी चौगुले साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताबेत घेतला. चौगुले साहेब यांनी पंच नं.1 श्री.कलकुटगी यांना घडलेली हकीकत विचारली असता पंच नं.1 यांनी घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला हकीकत विचारली असता मी ही त्यांना घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर चौगुले साहेबांनी मला लाच रक्कम 8,000/-रुपये हजर करणेस सांगीतली. त्याप्रमाणे मी 8,000/-रुपये लाच रक्कम हजर केली. त्यामध्ये 2,000/- रुपये दराची चार नोटा होत्या. त्यानंतर चौगुले साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी अँथ्रासिन पावडरचे उपयोग व गुणधर्म सांगीतले. त्यानंतर पोहेक. भोरे यांनी 8,000/-रुपये रकमेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावून ती लाच रक्कम लोकसेवक ड.प्रविण सवासे, पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती मिरज यांना देणेसाठी माझे शर्टचे समोरील डावे बाजूचे खिशात ठेवली. त्यानंतर चौगुले साहेबांनी. मला दोन्ही पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या सुचना दिल्या. पोहेक.भोरे यांना जागीच थांबण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर चौगुले साहेब यांनी व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला, तो मी माझे पटचे समोरील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवला. मला व पंच नं.1 श्री.कलकुटगी यांना रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे आम्ही माझेकडील मोटरसायकल वरुन रवाना झालो. आमचे पाठोपाठ चौगुले साहेब व सापळा पथक शासकीय टाटा सुमो गाडीतून रवाना झाले. मी व पंच नं.1 असे मिरज पंचायत समिती कार्यालयाच्या मेन गेट मधून आत जावून पार्कीग जागेत जावून मोटर सायकल त्याठिकाणी पार्क केली. मी व पंच नं.1 असे चालत पंचायत समिती कार्यालयातील पशू संवर्धन विभागामध्ये जावून ड.प्रविण सवासे, यांचे केबीनमध्ये गेलो. सवासे साहेबांचे मोबाईलवर कोणीशी तरी बोलणे चालू असलेने मी व पंच नं.1 असे त्यांचे समोरील खुर्चीवर जावून बसलो. त्यांचे बोलणे झालेवर मी त्यांना पैसे घेवून आलो असलेचे सांगीतले, त्यावेळी त्यांनी आजून एक हजार रुपये दयायला पाहीजेत असे म्हणू लागले. त्यावेळी मी त्यांना मगाशीतर तुम्ही आठ हजार रुपये म्हणाला व आता परत एक हजार रुपये कसे मागायला लागलाय असे म्हणालो, त्यानंतर माझ्या वरच्या दोन तीन अधिका-यांना पण पैसे दयायला लागत्यात, मला यातील काही राहत नाहीत मला फक्त 500/-रुपये राहतात, आज पर्यत 500/-रुपये पेक्षा जास्त कुणाचे मिदयात नाही, मला यातील फक्त 500/-रुपयेच राहणार आहेत असे म्हणाले, त्यावेळी मी त्यांना एक हजार रुपये उदया देतो असे म्हणून माझे अंगावरील शर्टचे डावे बाजूचे खिशात अंथ्रासीन पावडर लावुन ठेवलेली 8,000/-रुपये लाच रक्कम मी माझे उजवे हाताने बाहेर काढुन ड. सवासे यांचेसमोर धरली असता, त्यांनी ती त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजून सदरची लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने त्यांचे टी शर्टचे समोरील डावे बाजूचे खिशात ठेवली. त्यानंतर मी लागलीच केबीन मधून बाहेर येवून कार्यालयाचे बाहेर आलो व माझा डावा हात डोकीवरुन फिरवून लाच स्विकारलेचा इशारा केला. लागलीच चौगुले साहेब, पंच नं.2 व सापळा पथक असे माझे जवळ आले. चौगुले साहेब यांनी माझेकडून व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला व मला बाजूला जावून थांबण्यास सांगून ते सर्वजण लोकसेवक ड.प्रविण सवासे, पशुधन विकास अधिकारी यांचे कार्यालयामध्ये गेले. मी कार्यालयाचे बाजूला थांबून राहीलो. थोडयावेळाने चौगुले साहेब यांनी मला ड.सवासे, पशुधन विकास अधिकारी यांचे केबीनमध्ये बोलवून घेतले. सदर केबीनमध्ये अंधार करुन माझे हात व कपडे तपासण्यात आले. त्यावेळी माझे उजवे हाताचे बोटावर व शर्टचे पुढील डावे बाजुचे खिशाचे तोंडास व आतील बाजुस अँ.पा.ची चकाकी दिसून आली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला बाहेर जावुन थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी तेथून बाहेर जावुन थांबलो. त्यानंतर काही वेळाने चौगुले साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे लोकसेवक ड.प्रविण सवासे, यांना घेवुन जावू लागले. त्यावेळी चौगुले साहेब यांनी दिले सुचने प्रमाणे मी माझे मोटर सायकल वरुन निघुन अँन्टी करप्शन कार्यालय, सांगली येथे हजर झालो. माझे पाठोपाठ सापळा पथक लोकसेवक ड.सवासे, यांचेसह अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे दाखल झाले. त्यावेळी चौगुले साहेबांनी मला कार्यालयाचे बाहेर थांबणेस सांगीतले, त्याप्रमाणे मी बाहेर थांबलो. चौगुले साहेबांनी त्यांची पुढील कारवाई सुरु ठेवली. त्यानंतर थोडयावेळाने चौगुले साहेबांनी मला कार्यालयात बोलावून घेवून त्यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली, त्यानंतर मला कार्यालयाचे बाहेर जावून थांबण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी कार्यालयाचे बाहेर जावून थांबलो. त्यानंतर पुन्हा थोडया वेळाने चौगुले साहेब यांनी मला कार्यालयामध्ये बोलावुन घेवुन सापळयाची हकीकत विचारली. त्यावेळी मी त्यांना सापळयाची सविस्तर हकीकत सांगीतली. चौगुले साहेबांनी घडले घटनेचा सविस्तर पंचनामा केला. दि.28.01.2020 रोजी 13.41 वा पडताळणी व सापळा कारवाईचे वेळी मी शेळी गट या योजनेसाठी पंचायत समिती मिरज येथे मंजुर झाले अर्जावरुन मला अनुदानाची रक्कम मंजूर करून देण्याकरता लोकसेवक ड.प्रविण सुभाष सवासे, पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती मिरज *यांनी माझेकडे 10,000/- रूपयाची लाच मागणी करुन चर्चेअंती 8,000/-रुपयाची मागणी करुन ती स्विकारली आहे* म्हणून माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): balu mahadev koli
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): psmah23764 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
महात्मा गांधी चौक
पोलीस ठाणे, मिरज

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): pravinkumar devappaa kamt
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402ssmgm8202y